**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २१ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **दोन नवीन केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात खारीज.**
2. **सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावलेली राजकीय भित्तिपत्रकं त्वरित हटवण्याचे निवडणूक आयोगाद्वारे निर्देश.**
3. **काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये याकरता यंत्रणांचा वापर करुन त्रास दिला जात असल्याचा अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा आरोप.**

   **आणि**
4. **विदर्भात फलोत्पादन क्षेत्र विकसित करण्यासाठी अंतराळ क्षेत्राचा वापर करता येईल - इस्त्रोचे प्रमुख एस.सोमनाथ यांचं नागपुरात प्रतिपादन.**

   *****

**केद्रीय निवडणूक आयुक्त**

गेल्या आठवड्यात केंद्रीय निवडणूक आयोगात, माजी आय.ए.एस. अधिकारी ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची, आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली होती. या दोघांच्या नियुक्तीला स्थगितीची मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावल्या. त्यामुळं हे दोन्ही अधिकारी आयुक्तपदी कायम राहणार आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपांकर दत्त यांच्या खंडपीठानं ही याचिका फेटाळली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर या कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देता येणार नाही असं न्यायालयानं स्पष्ट केलं. सुनावणी दरम्यान न्यायालयानं या दोन नवीन निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी अवलंबलेल्या प्रक्रियेवर केंद्र सरकारला देखील प्रश्न विचारला आहे.

**विकसित भारत संदेश आदेश**

रेल्वे तसंच विमानतळांसारख्या सार्वजनिक ठिकाणी अन-धिकृतपणे लावलेली राजकीय भित्तिपत्रकं त्वरित हटवावी असे निर्देश, निवडणूक आयोगानं केंद्र सरकार, सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. देशभरात अशा अनेक ठिकाणी, अन-धिकृत राजकीय जाहिराती अजूनही प्रदर्शित केल्या जात असल्याच्या तक्रारी, आपल्याकडे विविध स्तरातून येत असल्याचं निवडणूक आयोगानं यासंदर्भात

लिहीलेल्या पत्रात म्हटलं आहे. त्याचप्रमाण इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं, व्हॉट्सॲपवर प्रसारित होणारे विकसित भारत अभियानाबद्दलचे संदेश त्वरित थांबवावेत असे निर्देश देखील, निवडणूक आयोगानं दिले आहेत. लोकसभा निवडणूक घोषित झाल्यानंतरही नागरिकांच्या मोबाइल फोनवर हे संदेश प्रसारित होत असल्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्याचं, निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. मात्र आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी हे संदेश पाठवले होते आणि तंत्रज्ञान नेटवर्कच्या मर्यादेमुळं ते उशिरा प्रसारित झाले असावेत असं, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

**पतंजली**

पतंजली कंपनीच्या औषधांबाबत भ्रामक दावे करणाऱ्या जाहिरातीच्या संदर्भात कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बाळकृष्ण यांनी सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना दोन एप्रिल रोजी न्यायालयापुढे हजर राहण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर कंपनीनं आज बिनशर्त माफीचे प्रतिज्ञापत्र सादर केले. भविष्यात अशा जाहिराती दिल्या जाणार नाहीत याची आम्ही काळजी घेऊ असंही त्यांनी न्यायालयाला सांगितलं. गेल्या वर्षी २७ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयानं पतंजली आयुर्वेदला रक्तदाब, मधुमेह, संधिवात, दमा आणि लठ्ठपणा यांसारख्या आजारांवरील औषधांच्या जाहिराती प्रकाशित करण्यास मनाई केली होती. नोव्हेंबर २०२३ मध्ये कंपनीनं सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिलं की ते वैद्यकीय कार्यक्षमतेबद्दल, कोणतेही विधान किंवा निराधार दावे करणार नाही किंवा वैद्यकीय प्रणालीवर टीका करणार नाही. मात्र, कंपनीनं दिशाभूल करणाऱ्या जाहिराती सुरूच ठेवल्या होत्या. भविष्यात अशा जाहिराती पतंजलीद्वारे दिल्या जाणार नसल्याची खात्री देखील या कंपनीनं आज न्यायालयात दिली आहे.

**लोकसेवा आयोग**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या, राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२२ या परीक्षेतून, गट-अ आणि गट-ब राजपत्रित पदाच्या, एकूण २३ संवर्गांसाठी अर्हता प्राप्त उमेदवारांच्या तात्पुरत्या निवड याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. आयोगानं प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार, उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प २७ मार्च २०२४ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यांनंतर शिफारस यादी गुणवत्ता यादीसह आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल असं, आयोगानं कळविलं आहे.

**पोटनिवडणुक**

लोकसभा निवडणुकीसोबत, अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील, पोटनिवडणूक होत असून, राज्यातील ही एकमेव पोटनिवडणूक आहे. या पार्श्वभूमीवर, निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी, फडवणीस यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत, अकोल्यात आढावा बैठक घेतली. त्यांनी अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांकडून विधानसभांचा आढावा घेतला. या बैठकीला, अकोला लोकसभा मतदारसंघातील दोन्ही जिल्ह्यातील पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींची देखील उपस्थिती होती.

**रोख्यांची विक्री**

महाराष्ट्र शासनाच्या १५ वर्षे मुदतीच्या दोन हजार कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री लिलावानं करण्यात येणार असून, या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा, विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल अशी माहिती, वित्त विभागाच्या सचिव, शैला ए. यांनी, पत्रकाद्वारे दिली आहे. स्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक आणि संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. २६ मार्च २०२४ रोजी, भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई इथल्या कार्यालयात हा लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस त्याच दिवशी, संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, ई-कुबेर सिस्टीमनुसार, सादर करावयाचे आहेत.

**मल्लिकार्जुन खरगे**

आगामी लोकसभा निवडणूक, निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात व्हावी असं, आवाहन काँग्रेस अध्यक्ष, मल्लिकार्जुन खरगे यांनी देशातल्या संवैधानिक संस्थांना केलं आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणूक रोखे व्यवहाराबद्दल, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तपशील उघड झाला. काँग्रेसला अकरा कोटी रुपये रोख्यांद्वारे मिळाले आहेत. भाजपानं अद्याप काहीही कर भरलेला नाही. याबाबत यंत्रणा गप्प आहेत असं ते म्हणाले. मात्र दुसरीकडे कांग्रेसची खाती गोठवली आहेत, विविध यंत्रणांकडून विनाकारण नोटिसा जारी केल्या जात आहेत. एकूण काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये याकरता विविध यंत्रणांचा वापर करुन त्रास दिला जात आहे असा आरोप त्यांनी केला. लोकशाहीचं रक्षण करण्याच्या दृष्टीनं निवडणूक समान पातळीवर लढण्याची संधी, काँग्रेसला मिळावी असं आवाहन, खरगे यांनी केलं. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेता सोनिया गांधी आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

**एस सोमनाथ**

अंतराळ क्षेत्र आपल्याला वैज्ञानिक प्रेरणा देत असून, भारताची यशस्वी चांद्रयान-तीन मोहीम आणि आदित्य-एल1 मोहीम हे त्याचं उदाहरण आहेत. याच मालिकेतील, गगनयान मोहीम हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, भारतीय अंतराळ संशोधन संस्था हे एक मोठं क्षेत्र आहे. देशभरात विविध ठिकाणी, १७ हजार कर्मचारी याचा एक भाग असून, विदर्भात फलोत्पादन क्षेत्र आणि ती विकसित करण्यासाठी, अंतराळ क्षेत्राचा वापर करता येईल असं, प्रतिपादन इस्त्रोचे प्रमुख, एस.सोमनाथ यांनी नागपुरात केलं. आज विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ आयोजित, अंतरीक्ष महायात्रे अंतर्गत, विदर्भ टूर ऑफ स्पेस ऑन व्हील'च्या, समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. विज्ञान भारतीच्या, विदर्भ टूर ऑफ स्पेस ऑन व्हील, या उपक्रमाला उदंड असा प्रतिसाद मिळाला असून, ही सर्व, विदर्भासाठी गौरवास्पद बाब आहे. विज्ञान भारतीचा प्रवास, १९९१ पासून सुरू झाला आणि विज्ञान क्षेत्रातील नवनवीन प्रयोग, तंत्रज्ञान, समाजापुढं मांडून ते सविस्तर समजावणे असा उद्देश घेऊन, हि संस्था काम करत असल्याचं, सी.एस.आय.आर.चे माजी संचालक, शेखर मांडे यांनी सांगितलं.

**प्राप्तिकर विभाग तक्रार क्रमांक**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका, २०२४ ची प्रक्रिया, संपूर्ण भारतात सुरू झाली असून, या पार्श्वभूमीवर, लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये, विदर्भ आणि नाशिक क्षेत्रात, रोख रक्कम, मौल्यवान वस्तू इत्यादींचा बेकायदेशीर वापर होत असल्यास त्या संबंधित माहिती आणि तक्रारींसाठी, नागपूरच्या प्राप्तिकर विभागानं चोवीस तास सुरु राहणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. हा कक्ष आठवड्याचे सातही दिवस कार्यरत राहणार असून, नागरिकांना तक्रार नोंदविण्यासाठी, टोल फ्री क्रमांक :१८००-२३३-०३५५ किंवा १८००-२३३-०३५६ तसंच, छायाचित्र, चित्रफीत इत्यादी पाठवण्यासाठी, व्हॉटसॲप क्रमांक ९४०३३-९०९८० उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**पोलीस दल कारवाया**

आगामी लोकसभा निवडणुका निर्भीड आणि निष्पक्ष वातावरणात पार पडाव्यात या दृष्टीनं, वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे, दक्ष राहून सातत्यानं कायदेशीर कारवाया केल्या जात आहेत. 'ऑपरेशन ऑल आऊट', 'कॉम्बिंग ऑपरेशन' आणि 'नाकाबंदी' आदि विशेष मोहिमा राबविल्या जात आहे. जिल्ह्यातील वाशिम, मंगरूळपीर आणि कारंजा उप-विभागातील प्रत्येक पोलीस स्थानक अंतर्गत, कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आलं. यावेळी जिल्हाभरात एकाच रात्रीत सहा शस्त्र अधिनियम कारवाया करण्यात आल्या असून, दारूबंदी अधिनियम अन्वये एकूण २६ कारवाया करत सहा

लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त आणि नष्ट करण्यात आल्याची माहिती, जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं, आज दुपारी तीन वाजता एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे, देण्यात आली.

**चंद्रपूर लोकसभा मतदारसंघ**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाकरीता, हेमंत हिंगोनिया यांची खर्च निरीक्षक म्हणून, नियुक्ती करण्यात आली आहे. हिंगोनिया यांनी कोषागार कार्यालय इथल्या स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय इथं, खर्च विषयाशी संबंधित यंत्रणेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी, सर्व नोडल अधिकारी आणि, खर्च व्यवस्थापना संदर्भात, उपस्थित इतर अधिकारी तसंच कर्मचा-यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच आणि योग्य प्रकारे करण्याच्या सुचना दिल्यात. निवडणूक खर्चा संदर्भात मत आणि तक्रारींसाठी प्रत्यक्ष भेटून किंवा ९४०४९-२११४६ या क्रमांकावर नागरिक फोन करू शकतात.

******